स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

# Examination Section (Professional Unit)

**Phone: (02462) 229294,**
**Fax : (02462) 229520**
**Website: www.srtmun.ac.in**
**E-mail: srtmuncoe@gmail.com**

संदर्भः परीक्षा/फार्मसी/2015–16/3045 दिनांकः 27.10.2015

प्रति,
**प्राचार्य,**
औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**विषयः–** बी. फार्मसी. नवीन (CGPA) व वार्षिक पध्दतीच्या (Old) अभ्यासक्रमांसाठी परीक्षा आवेदनपत्र व पुनर्मुल्यांकन अर्ज सादर करणे तथा समकक्षतेबाबत.

**संदर्भ :–** 1.संचालक, म.वि.वि.म.,प्रस्तुत विद्यापीठ यांचे पत्र क्र. शैक्षणिक(1)/औषधनिर्माणशास्त्र/2015–16/1322, दि. 30.09.2015.
2.संचालक, म.वि.वि.म.,प्रस्तुत विद्यापीठ यांचे पत्र क्र. शैक्षणिक(1)/औषधनिर्माणशास्त्र/2015–16/1523, दि. 19.10.2015.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये संबंधित कार्यालयाने सूचीत केल्यानुसार, आपणांस बी. फार्मसी. नवीन (CGPA) व वार्षिक पध्दती (Old) अभ्यासक्रमांसाठी परीक्षा आवेदनपत्र व पुनर्मुल्यांकन अर्ज सादर करणे तथा समकक्षतेबाबत खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे :–

**अ) बी. फार्मसी सत्र पध्दती अभ्यासक्रमाबाबत......**

1. उन्हाळी–2015 परीक्षेमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज सादर केले आहेत, ते विषय सोडून कोणत्याही एका विषयासाठी अतिरिक्त विषयाकरिता पुनर्मुल्यांकनासाठी दि. 03.11.2015 पर्यंत विद्यार्थ्यांस महाविद्यालयाकडे अर्ज करता येईल. सर्व विद्यार्थ्यांचे पुनर्मुल्यांकनासाठीचे अर्ज व एकूण फीसाठीचा धनाकर्ष 04.11.2015 रोजी तयार करुन संबंधित महाविद्यालयाने दि. 05.11.2015 रोजी विद्यापीठात सादर करावेत.
2. बी. फार्मसी प्रथम वर्ष अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांस द्वितीय वर्ष तृतिय सत्राकरिता दि. 03.11.2015 पर्यंत परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयात सादर करता येईल. सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र व एकूण फीचा धनाकर्ष 04.11.2015 रोजी तयार करुन संबंधित महाविद्यालयाने दि. 05.11.2015 रोजी विद्यापीठात सादर करावेत. तथापि, संबंधित विद्यार्थ्यांनी प्रथम वर्ष अनुत्तीर्ण विषय हे हिवाळी 2015 मध्ये उत्तीर्ण करणे बंधनकारक आहे.
3. बी. फार्मसी प्रथम वर्षासाठी ATKT ही एकूण 13 विषयांपैकी 04 विषयांसाठी विशेष बाब म्हणून देण्यात आल्यामुळे, अशा सर्व विद्यार्थ्यांच्या मुळ गुणपत्रिका दुरुस्तीसाठी संबंधित विभागात दि. 05.11.2015 पर्यंत जमा करण्यात यावे.

**ब) बी. फार्मसी वार्षिक पध्दती अभ्यासक्रमाबाबत......**

1. **समकक्षता (Equvivalence)** :– बी. फार्मसी सन 2013–14 व तत्पुर्वीच्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांस नवीन अभ्यासक्रम द्वितीय वर्ष तृतिय सत्राकरिता दि. 03.11.2015 पर्यंत परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयात सादर करता येईल. सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र व एकूण फीसाठीचा धनाकर्ष 04.11.2015 रोजी तयार करुन संबंधित महाविद्यालयाने दि. 05.11.2015 रोजी विद्यापीठात सादर करावेत.
2. बी. फार्मसी वार्षिक पध्दतीच्या विद्यार्थ्यांसही प्रत्येक वर्षातील तीन विषय पूनर्मुल्यांकनासाठी विशेष बाब म्हणून परवानगी असल्यामुळे, त्यांनीही अ.क्र. 01 प्रमाणेच अर्ज करावेत.
3. लेखी परीक्षेत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी सेशनल ईम्प्रूव्हमेंटची परीक्षा हिवाळी–2015 प्रात्यक्षिक परीक्षेसोबतच होईल, यासाठीचे परीक्षा आवेदनपत्र हे वरील परिच्छेद 'अ' प्रमाणेच सादर करण्यात यावेत.
4. वार्षिक पध्दतीच्या बी. फार्मसी अभ्यासकमासाठी, अ.क्र. 01 च्या पत्रात नमूद मार्गदर्शनानुसार, तृतिय व अंतिम वर्षामध्ये प्रवेशपात्र विद्यार्थ्यांस मागील दोन वर्षामध्ये नवीन पध्दतीप्रमाणे ए.टी.के.टी मान्य झाल्यानुसार, त्याच्याही गुणपत्रिका हया संबंधित विभागात दि. 05.11.2015 रोजी किंवा तत्पूर्वी महाविद्यालयांनी सादर करावेत.
5. बी. फार्मसी वार्षिक पध्दतीच्या विद्यार्थ्यांस वरील अ.क्र. 01 ते 04 साठीचे लाभ देतांना, अ.क्र. 01 च्या सदंर्भीय पत्रान्वये मा. संचालक, म.वि.वि.म., प्रस्तुत विद्यापीठ यांनी निर्देशीत केल्याप्रमाणे सर्व नियम व अटी लागू राहतील; याची सर्व संबंधित विद्यार्थी व संबंधित महाविद्यालयांनी नोद घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**क) एम. फार्मसी वार्षिक पध्दतीच्या अभ्यासक्रमाबाबत......**

M. Pharm. CGPA मध्ये प्रवेशित झालेल्या पण अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष उत्तीर्ण झाल्यानंतर द्वितीय वर्षामध्ये त्यांचा प्रवेश हा M. Pharm. CGPA pattern प्रमाणेच ग्राहय धरण्यात यावा व संबंधित नियम व कार्यवाही ही M. Pharm. CGPA प्रमाणेच राहील.

आपला

**प्र. परीक्षा नियंत्रक**